कार्यालय जिल्हा समादेशक होमगार्ड, वाशिम
जिल्हा क्रिडा संकुल इमारत बस स्टॅन्ड जवळ वाशिम 444505
**Email ID :- dchgwashim29@yahoo.com Off Tel No 07252 / 299321**

जावक क्रमांक :– 186 / जिहोगा / प्रशा. / 2024 दिनांकः– 24 / 07 / 2024

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
वाशिम.

विषय :– होमगार्ड नोंदणी ची बातमी प्रसिध्द करणे बाबत.

–––––000–––––

उपरोक्त विषयान्वये वाशिम जिल्हयातील रिक्त होमगार्ड अनुशेष पुर्ण करणे करीता होमगार्ड नोंदणीचे आयोजन करण्यात येणार आहे. याची खालील प्रमाणे बातमी जिल्हयातील सर्व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावी, ही विनंती.

## प्रेस नोट

वाशिम जिल्हा होमगार्ड मधील रिक्त असलेल्या 59 जागा भरणेकरिता होमगार्ड नोंदणीचे आयोजन केलेले आहे. याकरिता दिनांक 14 / 08 / 2024 अखेर ऑनलाईन अर्ज मागविणेत येत असुन होमगार्ड नोंदणीचे माहितीपत्रक नियम व अटी याबाबत विस्तृत माहिती **https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तरी होमगार्ड मध्ये सेवा करू इच्छित असलेल्या वाशिम जिल्हयातील रहिवासी उमदेवारांनी नोंदणी करिता अर्ज करावा. असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक, वाशिम श्री. भारत तांगडे यांनी केले आहे.

( भारत तांगडे )
अपर पोलीस अधीक्षक
तथा,
जिल्हा समादेशक, होमगार्ड वाशिम.

प्रत :– माहिती करीता
सहायक संचालक,जिल्हा सेवायोजन कार्यालय, वाशिम.

माहीतीपत्रक

## – होमगार्ड संघटना –

**उददेश** : देशातील जास्तीत जास्त नागरीकांना सैनिकी, तसेच आपतकालीन मदतकार्याचे, कायदा वा सुव्यवस्था सुरळित राखण्याचे प्रशिक्षण देवून जबाबदार व शिस्तप्रिय नागरीक घडविणे हा होमगार्ड संघटनेचा उददेश आहे.

**१ होमगार्ड सदस्यत्व –** महाराष्ट्रातील होमगार्ड संघटना ही शासन संचालीत पूर्णत: मानसेवी तत्वावर आधारीत आहे. या संघटनेचे सदस्यत्व होणे म्हणजे कोणत्याही प्रकारची नोकरी अथवा रोजगार नाही. हे सदस्यत्व तीन वर्षाकरीता दिले जात असुन आपण संघटनेसाठी दिलेल्या सेवेच्या गुणवत्तेवर पुढे ३–३ वर्षाचे टप्प्याने वयाच्या ५८ वर्षापर्यंत पुर्ण नोंदणीकृत करता येते.

**२ होमगार्ड सदस्यांचे कर्तव्य –** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही. पोलीस दलाचे मागणी प्रमाणे कायदा व सुव्यस्था राखणे कामी पोलीस दलासोबत बंदोबस्त कर्तव्य, आपतकालीन परिस्थीती मध्ये अश्निशमन, विमोचन, पूरविमोचन तसेच रोगराई/महामारीकाळात, संपकाळात प्रशासनांस मदतकार्य अशी कर्तव्ये दिली जातात.

**३ होमगार्ड ना देय भत्ते :–** होमगार्ड सदस्यांना बंदोबस्त काळात प्रतिदीन रू ५७०/– कर्तव्य भत्ता व रू १००/– उपहारभत्ता दिला जातो. तसेच प्रशिक्षण काळात रू ३५/– खिसाभत्ता व रू १००/– भोजनभत्ता व साप्ताहीक कवायती साठी रू ९०/– कवायत भत्ता दिला जातो.

**४ शास्ती :–** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही परंतु अत्यावश्यक प्रसंगी बंदोबस्त कर्तव्याकरीता विनाकारण अनुपस्थित राहणा–या / कर्तव्यामध्ये कसूर करणा–या /आदेशाचे पालन न करणा–या/ होमगार्ड सदस्यांवर मुंबई होमगार्ड अधिनियम १९४७ कलम ७ (१) अन्वये बडतर्फ किंवा रू २५० /–इतका दंड / तीन महीन्याची साधी कैद अशी शिक्षा करण्याची तरतुद आहे.

**५ होमगार्ड नोंदणी :–** होमगार्ड नोंदणी करीता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकरले जात नाही. सदस्यत्व मिळणे करीता कोणत्याही इतर मार्गाचा ( वशिला किंवा लाच ) अवलंब करू नये या करीता कोणीही लाच / पैशाची मागणी केल्यास अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती तथा उपअधिक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम किंवा जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधिक्षक वाशिम यांचेशी संपर्क साधावा.

**६ होमगार्ड सदस्यत्वाचे फायदे :–**

अ) सैनिकी गणवेश परिधान करणेचा मान व विनाशुल्क सैनिकी प्रशिक्षण

ब) ३ वर्ष सेवापुर्ण होमगार्डना राज्य पोलीस दल , वनविभाग, अग्निशमन दलामध्ये ५ टक्के आरक्षण

क) प्रथमोपचार, अग्निशमन, विमोचन या सारख्या विषयांचे प्रशिक्षण घेण्याची संधी

ड) गौरवास्पद कामगिरी केल्यास विविध पुरस्कार/पदके मिळण्याची संधी

इ) स्वत:चा व्यवसाय /शेती इ. संभाळत देशसेवा करण्याची संधी

# होमगार्ड नोंदणी नियम व अटी

१ **होमगार्ड पात्रतेचे निकष :**

**अ) शैक्षणिक पात्रता :–** कमीत कमी १० वी उत्तीर्ण (एस.एस.सी.)

**ब) शारीरिक पात्रता :–**

१) वय– २० वर्ष पुर्ण ते ५० वर्षाच्या आत ( १६/०८/२०२४ रोजी)

२) उंची – पुरूषां करीता :– १६२ सेमी
महीलां करिता :– १५० सेमी

३) छाती – फक्त पुरूष उमेदवारांकरीता

( न फुगविता किमान ७६ सेमी व छाती फुगवुन ८१ सेमी आवश्यक आहे.)

**क) आवश्यक कागदपत्र :–**

१) रहिवासी पुरावा – आधारकार्ड, मतदान ओळखपत्र.
२) शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र–
३) जन्मदिनांक पुराव्याकरीता एस.एस.सी बोर्ड प्रमाणपत्र/ शाळा सोडल्याचा दाखला
४) तांत्रिक अहर्ता धारण करीत असल्यास तत्सम प्रमाणपत्र.
५) खाजगी नोकरी करीत असल्यास मालकाचे ना–हरकत प्रमाणपत्र
६) ३ महीन्याचे आतील पोलीस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र

२ शारिरीक क्षमता चाचणी :

अ) धावणे

| पुरूष उमेदवार | | महीला उमेदवार | |
|---|---|---|---|
| १६०० मी धावणे | २० गुण | ८०० मी धावणे | २५ गुण |
| ५ मि १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २० गुण | २ मि ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २५ गुण |
| ५ मि १० सेकंद पेक्षा जास्त परंतु ५ मि ३० सेकंदापेक्षा कमी | १८ गुण | २ मि ५० सेकंद पेक्षा जास्त परंतु ३ मि ०० सेकंदापेक्षा कमी | २२ गुण |
| ५ मि ३० सेकंद पेक्षा जास्त परंतु ५ मि ५० सेकंदापेक्षा कमी | १६ गुण | ३ मि ०० सेकंद पेक्षा जास्त परंतु ३ मि १० सेकंदापेक्षा कमी | १६ गुण |
| ५ मि ५० सेकंद पेक्षा जास्त परंतु ६ मि १० सेकंदापेक्षा कमी | १४ गुण | ३ मि १० सेकंद पेक्षा जास्त परंतु ३ मि २० सेकंदापेक्षा कमी | १४ गुण |
| ६ मि १० सेकंद पेक्षा जास्त परंतु ६ मि ३० सेकंदापेक्षा कमी | १२ गुण | ३ मि २० सेकंद पेक्षा जास्त परंतु ३ मि ३० सेकंदापेक्षा कमी | १२ गुण |
| ६ मि ३० सेकंद पेक्षा जास्त परंतु ६ मि ५० सेकंदापेक्षा कमी | १० गुण | ३ मि ३० सेकंद पेक्षा जास्त परंतु ३ मि ४० सेकंदापेक्षा कमी | १० गुण |
| ६ मि ५० सेकंद पेक्षा जास्त परंतु ७ मि १० सेकंदापेक्षा कमी | ६ गुण | ३ मि ४० सेकंद पेक्षा जास्त परंतु ३ मि ५० सेकंदापेक्षा कमी | ०६ गुण |
| ७ मि १० सेकंद पेक्षा जास्त परंतु ७ मि ३० सेकंदापेक्षा कमी | २ गुण | ३ मि ५० सेकंद पेक्षा जास्त परंतु ४ मि ०० सेकंदापेक्षा कमी | ०२ गुण |
| ७ मि ३० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण | ४ मि ०० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण |

(**सुचना –** धावणे चाचणी मध्ये पात्र होणे करीता किमान १० गुण मिळविणे आवश्यक राहील.)

**ब) गोळाफेक** – पुरूष उमेदवारां करीता

| गोळाफेकीचे अंतर मीटर मध्ये | | |
|---|---|---|
| ८.५० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | –– | १० गुण |
| ७.९० मीटर किंवा जास्त | ८.५० मीटर पेक्षा कमी | ०९ गुण |
| ७.३० मीटर किंवा जास्त | ७.९० मीटर पेक्षा कमी | ०८ गुण |
| ६.७० मीटर किंवा जास्त | ७.३० मीटर पेक्षा कमी | ०७ गुण |
| ६.१० मीटर किंवा जास्त | ६.७० मीटर पेक्षा कमी | ०६ गुण |
| ५.५० मीटर किंवा जास्त | ६.१० मीटर पेक्षा कमी | ०५ गुण |
| ४.९० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटर पेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.३० मीटर किंवा जास्त | ४.९० मीटर पेक्षा कमी | ०३ गुण |
| ३.७० मीटर किंवा जास्त | ४.३० मीटर पेक्षा कमी | ०२ गुण |
| ३.१० मीटर किंवा जास्त | ३.७० मीटर पेक्षा कमी | ०१ गुण |
| ३.१० मीटर पेक्षा कमी | – | ०० गुण |

**क) गोळाफेक** – महिला उमेदवारांकरीता

| गोळाफेकीचे अंतर मीटर मध्ये | | |
|---|---|---|
| ६.०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | –– | १० गुण |
| ५.५० मीटर किंवा जास्त | ६.०० मीटर पेक्षा कमी | ०८ गुण |
| ५.१० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटर पेक्षा कमी | ०६ गुण |
| ४.५० मीटर किंवा जास्त | ५.०० मीटर पेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.०० मीटर किंवा जास्त | ४.५० मीटर पेक्षा कमी | ०२ गुण |
| ४.०० मीटर किंवा कमी | –– | ०० गुण |

सुचनाः– १) उमेदवाराला जास्तीत जास्त तीन संधी दिल्या जातील व त्यातील अधिक्तम अंतर ग्राहय धरले जाईल.

२) गोळा जर सिमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारांना नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील.

३) गोळाफेक मध्ये पात्र होणेकरीता उमेदवारांना किमान ४ गुण मिळविणे आवश्यक राहील.

## ड) तांत्रिक अहर्ता गुण –

| तांत्रिक अर्हता एकुण गुण १० | अटीची पुर्तता केल्यास | गुण |
|---|---|---|
| १ आय. टी.आय प्रमाणपत्र धारक | यापैकी १ अट पुर्ण करीत असेल तर | २ गुण |
| २ खेळामध्ये प्राविण्य मिळविलेल्या व्यक्ती (जिल्हास्तरीयक्रिडास्पर्धामध्ये प्राविण्य प्राप्त ) | यापैकी २ अट पुर्ण करीत असेल तर | ३ गुण |
| ३.माजी सैनिक (डिस्चार्ज कार्ड आवश्यक ) | यापैकी ३ अट पुर्ण करीत असेल तर | ४ गुण |
| ४. एन.सी.सी (बी )प्रमाणपत्र | यापैकी ४ अट पुर्ण करीत असेल तर | ५ गुण |
| ५. एन.सी.सी (सी) प्रमाणपत्र | यापैकी ५ अट पुर्ण करीत असेल तर | ७ गुण |
| ६. नागरी संरक्षण सेवेत परंतु स्थानिक ठिकाणी तीन प्रशिक्षण पुर्ण केलेले प्रमाणपत्र धारक | यापैकी ६ अट पुर्ण करीत असेल तर | ८ गुण |
| ७. जड वाहनचालक परवाना धारक | सर्व अटी पुर्ण करीत असतील तर | १० गुण |

(सुचना :– शारिरीक क्षमता चाचणी पात्र ठरल्यानंतरच तांत्रिक अर्हताचे गुण विचारात घेतले जातील.)

## नोंदणी अर्ज भरणे संदर्भातील सूचना :–

१. होमगार्ड नोंदणीचे अर्ज दि **२६/०७/२०२४ ते १४/०८/२०२४** या कालावधीमध्ये https://maharashtracdhg.gov.in./mahahg/enrollmentform.php या संकेतस्थळावर फक्त इंग्रजी या भाषेमधुन भरावयाचा असुन अर्ज भरतांना सर्व माहिती काळजीपुर्वक भरावयाची आहे. उदा. आधार कार्ड क्रमांक, जन्म दिनांक व्यवस्थित नोंद कराव्यात. एका उमेदवाराला आधारकार्ड क्रं. च्या सहाय्याने एकदाच अर्ज दाखल करता येईल.

२. उमेदवार ज्या भागातील रहिवासी आहे. तो भाग ज्या पोलीस ठाणेच्या अतंर्गत येतो त्यांना त्याच पोलीस ठाणे अतंर्गत पोलीस ठाणे आणि पथकामध्ये त्याचे जिल्हयात अर्ज दाखल करता येईल. इतर जिल्हयातील अर्ज बाद ठरतील.

३. अर्ज Submit केल्यावर Print Registration Form या मेनू मध्ये जावून त्याची छायांकीत प्रत काढावयाची आहे. त्यावर उमेदवाराने भरलेला सर्व मचकूर छापून येईल. त्यावर आपला वर्तमानातील एक फोटो चिटकवावा. मराठी मधील नाव उमेदवाराने स्वत: पेनाने लिहावयाचे आहे. इतर कोणतीही माहिती उमेदवाराने भरू नये.

**४. ऑनलाईन भरण्याची अंतिम मुदत दि. १४/०८/२०२४ सांय. ५ वाजेपर्यंत राहील.** सर्व अर्जाची छानणी झाल्यानंतर कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करिता तारीख जाहीर करण्यात येईल.

५. कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता येतांना अ.क्रं. १. क मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्राच्या उमेदवारानी स्वत: स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वत: घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणी करीता बंधनकारक राहील.

६. उमेदवारांना नोंदणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल. नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची राहील.

७. पात्र उमेदवारांची अंतिम निवड पोलीस ठाणे निहाय रिक्त असलेल्या जागानुसार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. समान गुण प्राप्त करणा–या उमेदवाराच्या बाबतीत वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. तसेच वय समान असेल तर शैक्षणिक अर्हता व तांत्रिक प्रमाणपत्राच्या आधारावर निवड निश्चित करण्यात येईल.

८. यापुर्वी होमगार्ड संघटनेतून अकार्यक्षम /बेशिस्त ठरल्याने न्यायालयीन प्रकरणी दोषी असल्याने सेवासमाप्त केलेले होमगार्ड नोंदणीस अर्ज करणेस अपात्र ठरतील. मात्र स्वेच्छेने राजीनामा दिलेले होमगार्ड विहित अटी पुर्ण करीता असतील तर अर्ज करणेस पात्र राहतील.

९. अंतिम गुणवत्ता यादी या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

१०. पथक/पोलीस ठाणे निहाय रिक्त जागा निश्चित करण्याचे सर्व अधिकारी मा. जिल्हा समादेशक यांनी राखून ठेवले आहेत.

११. अर्ज भरणेसंदर्भात काही अडचण असल्यास जिल्हा होमगार्ड कार्यालय, वाशिम येथे संपर्क करावा.

## ऑनलाईन अर्ज खालीलप्रमाणे भरावा.

होमगार्ड विभागाच्या https://maharashtracdhg.gov.in./mahahg/login1.php या संकेतस्थळावर जावून HGs ENROLLMENT या मेनूमधून ONLINE ENROLLMENT FORM हा सबमेनू निवडावा.

१. सर्व प्रथम जिल्हा Select करावा. ( ज्या जिल्हयात नोंदणी जाहिर झाली असेल तेच जिल्हे मेनू मध्ये उपलब्ध असतील.)

२. त्यानंतर आपण ज्या पोलीस ठाणेच्या हददी मध्ये राहता तो विभाग ज्या होमगार्ड पथकामध्ये येतो ते पथक आणि पोलीस ठाणे Select करावे. या करीता खालील तक्ता पहावा.

| अ.क्र. | होमगार्ड पथक | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|
| १. | वाशिम | वाशिम शहर, वाशिम ग्रामीण, मालेगांव, रिसोड, शिरपूर, जउळका, अनसिंग |
| २. | मंगरूळपीर | मंगरूळपीर, कारंजा शहर, कारंजा ग्रामिण, मानोरा, आसेगाव, धनज |

३. आपला १२ अंकी आधार क्रमांक काळजीपुर्वक भरावा. चुकीचा भरल्यास अर्ज बाद ठरविल्या जाईल.

४. यानंतर लिंग, पुर्ण पत्ता, शिक्षण, व्यवसाय, इमेल आयडी, ही माहिती काळजीपुर्वक भरावी.

५. वरील जाहिरातीमध्ये दिल्याप्रमाणे ज्या प्रकारची तांत्रिक अर्हता आहेत त्यांची संख्या Select करावी.

( उदा. उमेदवार जड वाहन परवानाधारक, प्राविण्यप्राप्त खेळाडू आणि NCC B प्रमाणपत्रधारक असेल तर तांत्रिक अर्हता संख्या तीन (Three) राहील.)

६. जन्मदिनांक, उंची ( से.मी. मध्ये ) काळजीपुर्वक भरावी.

७. यापुर्वी होमगार्ड सेवेत असाल तर YES असे निवडावे. असाल तर ज्या कारणास्तव कमी करणेत आले त्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

८. अर्ज SUBMIT केल्यावर आपण सरळ PRINT करण्यासाठीच्या Page वर जाल त्याठिकाणी आपला आधार क्रं. आणि जन्मदिनांक भरून आपल्या अर्जाची पाहणी करून अर्जाची PRINT A पेपरवर काढावी व नोंदणी करीता येतांना आवश्यक कागदपत्रासह सादर करावी. कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सर्वर कनेक्टीवीटी मिळत नसल्यास कार्यालयीन वेळ वगळून अर्ज भरावा.

DISTRICT COMMANDENT
HOME GUARD, WASHIM